# Study Circle Career Development Institute

# AMC
# Paper 1999

**A**

**Time : 1 Hrs.** **Marks : 200**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत **100** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्राची संकेताक्षरे | | | | | | | शेवटचा अंक |

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्याच विषयाचे प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आले आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

## एमपीएससी ''सहायक आयुक्त (मनपा)'' भरती १९९९

## चाळणी परीक्षा प्रश्नपुस्तिका क्रमांक (१)

१) स्थानिक स्वराज्य संस्थांवरील राज्य नियंत्रण व देखरेख आवश्यक असते कारण ....
अ) स्थानिक सरकारे राज्याच्या कायद्याने निर्मिलेली असतात
ब) राज्याच्या एका भागाचे त्या शासन करतात
क) त्या तांत्रिक कौशल्ये मोठ्या प्रमाणात धारण करीत नाहीत
ड) राज्याकडून त्यांना वित्तीय साह्य मिळते
(1) फक्त 'अ' बरोबर आहे (2) 'अ' व 'ब' बरोबर आहेत
(3) 'अ', 'ब' व 'क' बरोबर आहेत (4) सर्व बरोबर आहेत.

---

२) महानगरपालिका .... च्या मान्यतेने उपआयुक्ताची नेमणूक करते.
(1) केंद्र सरकार (2) राज्य सरकार
(3) जिल्हा परिषद (4) महाराष्ट्र लोकसेवा आयोग

---

३) लोकप्रशासनाचे दृष्टीकोन देणाऱ्या खालील जोड्यांपैकी कोणती जोडी बरोबर जुळणारी आहे?
(1) प्रशासकीय संस्थांच्या इतिहासाचा वर्तमान प्रशासनावर प्रभाव पडतो : तात्विक दृष्टीकोन
(2) गटांच्या इच्छा, पूर्वग्रह, मूल्ये, इ. त्यांचे वर्तणुकीवर प्रभाव टाकतात : मानसशास्त्रीय दृष्टीकोन
(3) सद्यकालीन राजकीय मुल्यांच्या संदर्भातच प्रशासनाचा विचार करावा लागतो : ऐतिहासिक दृष्टीकोन
(4) प्रशासन हे घटनात्मक चौकटीत काम करणारे असते : राजकीय दृष्टीकोन

---

४) खालील विधाने विचारात घ्या –
अ) महापौर हा त्या शहराचा प्रथम नागरिक असतो.
ब) महापौर हा महापालिकेच्या सभेचा अध्यक्ष असतो
क) महापौराची निवड म.न.पा. सदस्यांकडून केली जाते
ड) महापौराचा कार्यकाळ एक वर्ष असतो
वरील विधानापैकी ....
(1) फक्त 'अ' बरोबर आहे (2) 'अ' व 'ब' बरोबर आहेत
(3) 'अ', 'ब' व 'क' बरोबर आहेत (4) सर्व बरोबर आहेत

---

५) महानगरपालिकेचे अंदाजपत्रक ...... तयार करतात.
(1) महापौर (2) म.न.पा. सेक्रेटरी (3) लेखपाल (4) महापालिका आयुक्त

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

६) खालील विधाने विचारात घ्या –

अ) स्थानिक सरकारांकरिता राज्यघटनेच्या कलम २८० मध्ये वित्त आयोगाची योजना आहे.

ब) हे वित्त आयोग महानगरपालिकेचे वित्तीय पुनर्विलोकन करते.

क) हे वित्त आयोग भारताच्या राष्ट्रपतीला आपल्या शिफारसी सादर करते.

ड) हे वित्त आयोग केंद्र व महानगरपालिका यांच्यात कर विभागणीबाबत तत्त्वे घालून देते.

वरील विधानांपैकी –

(1) फक्त 'अ' बरोबर आहे (2) 'अ' व 'ब' बरोबर आहेत

(3) 'अ', 'ब' व 'क' बरोबर आहेत (4) सर्व बरोबर आहेत

---

७) खालीलपैकी कोणती जोडी योग्य जुळत नाही?

(1) स्थानिक शासन मंडळाचे नियंत्रण करणारे राज्य सरकारी तंत्र : राज्याराज्यात भि असतात

(2) अप्रत्यक्ष तंत्र : स्थानिक कृतीचे पुनर्विलोकन

(3) अटींसह अनुदान देणे : जास्त ताठर नसणारे तंत्र

(4) स्थानिक शासन मंडळाचा एखादा निर्णय रद्द ठरवणे : टोकाचे नसणारे परंतु सौम्य असे तंत्र

---

८) खालील विधाने विचारात घ्या –

*विधान (A) :* महानगरपालिकांकरिता १९९२ ची ७४ वी घटनादुरुस्ती महत्त्वपूर्ण ठरते.

*कारण (R) :* घटनादुरुस्तीने महानगरपालिकांना घटनात्मक दर्जा देण्यात आला आहे.

(1) A आणि R बरोबर परंतु R त्याचे योग्य कारण नाही

(2) A आणि R बरोबर व R त्याचे योग्य कारण आहे

(3) A बरोबर पण R चूक आहे

(4) A चूक पण R बरोबर आहे

---

९) खालीलपैकी कोणते विधान स्थानिक स्वराज्य संस्था व राज्य शासन यांच्या संबंधाबाबत योग्य वर्णन करणारे आहे?

(1) नगरपालिका व महानगरपालिका दोन्ही राज्य शासनाशी प्रत्यक्ष संबंधात येतात

(2) नगरपालिकांचा प्रत्यक्ष, तर महानगरपालिकांचा अप्रत्यक्ष संबंध येतो

(3) महानगरपालिका प्रत्यक्ष तर नगरपालिका यांचा जिल्हाधिकाऱ्या मार्फत अप्रत्यक्ष संबंध येतो

(4) स्थानिक शासनाचे व राज्य शासनाचे कोणतेही संबंध नाही

---

१०) खालीलपैकी कोणती जोडी जुळत नाही?

(1) खाजगी प्रशासन : नोकरशाहीचे (2) लोक प्रशासन : राजकीय

(3) खाजगी प्रशासन : लाल फितीपासून मुक्त (4) लोक प्रशासन : सार्वत्रिक व एकसारखी पद्धत

---

११) अभिप्रेरणा ही संकल्पना ...... विचार प्रणालीने मांडली.

(1) अभिजात (2) संभाव्यता (3) यंत्रणा (4) मानवी संबंध

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

१२) प्रशासनासंबंधीच्या लिखाणाबद्दल नोबेल पारितोषिक कुणाला मिळाले?

(1) पीटर ड्रकर (2) हबर्ट सायमन (3) टॉम पीटर्स (4) हेन्री फेयॉल

---

१३) खालीलपैकी कोणत्या प्रकारचे संघटन एका तात्पुरत्या दुष्काळी परिस्थितीचे निवारण करण्याकरिता उपयुक्त ठरेल?

(1) रेखीय प्रकार (2) समिती प्रकार

(3) रेखा व कर्मचारी प्रकार (4) मॅट्रीक्स प्रकार

---

१४) एक वरिष्ठ एकावेळी किती कनिष्ठांना हाताळू शकतो हे ज्या तत्वात सांगितले आहे ते तत्व म्हणजे –

(1) दिशादर्शनाची एकवाक्यता (2) आदेशाची एकवाक्यता

(3) कार्य विभागणी (4) नियंत्रणाची व्याप्ती

---

१५) अधिकार, जबाबदारी आणि ....... हे अधिकार प्रदानाचे तीन घटक आहेत.

(1) कर्तव्ये (2) सत्ता (3) उत्तरदायित्व (4) अहवाल देणे

---

१६) खालीलपैकी तोंडी संदेशवहनाची योग्य ती माध्यमे लिहा.

(1) कार्यक्रम, निमंत्रण, मुलाखत (2) सूचना, वृत्तपत्र, नियतकालिका

(3) दूरध्वनी, सभा, कार्यक्रम (4) संदेश, सूचना, निविदा

---

१७) ...... हा संघटनेचा प्रकार लष्करी संघटन म्हणून देखील ओळखला जातो.

(1) रेखा संघटन (2) कार्यात्मक संघटन

(3) रेखा आणि कर्मचारी संघटन (4) समिती संघटन

---

१८) समिती संघटन प्रकारात कोणाच्या मताचा विचार केला जातो.

(1) एक व्यक्ती (2) सर्व व्यक्ती (3) केवळ अधिकारी (4) केवळ कामगार

---

१९) पिटर ड्रकर यांच्या मते ....... हे घटक संघटन आराखडा ठरवणारे असतात.

(1) नियोजन, संघटन, नियंत्रण, कर्मचारी वर्ग

(2) बाजारपेठ, व्यय, कामगार, स्थळ

(3) कार्यक्षमता, अधिकारी, फोरमन, कामगार

(4) कार्य विश्लेषण, संबंध विश्लेषण, निर्णय विश्लेषण

---

२०) आधुनिक प्रशासकाला ....... यांचा उपयोग करणे माहीत असलेच पाहिजे.

(1) संगणक व गोळा केलेल्या माहितीवर आधारित पद्धत

(2) नियंत्रणाची संख्यात्मक तंत्रे

(3) नियोजनाचे तंत्र

(4) सिद्धांतावर आधारित संघटन

---



Study CIRCLE

२१) खालील विधानांचा विचार करून कोणते उत्तर बरोबर ते लिहा.

अ) व्यवस्थापन म्हणजे व्यवस्थापन करणारा समूह

ब) व्यवस्थापन ही एक प्रक्रिया असते

क) व्यवस्थापन हे एक सामाजिक शास्त्र आहे

ड) व्यवस्थापन म्हणजे नियंत्रण

(1) 'अ' बरोबर (2) 'अ' व 'क' बरोबर

(3) 'अ', 'ब' आणि 'क' बरोबर (4) 'अ' आणि 'ड' बरोबर

---

२२) रेखा व कर्मचारी संघटना प्रकारात अधिकार रेषेची दिशा कशा प्रकारची असते?

(1) खालून वर (2) वरून खाली (3) मध्यापासून वर (4) मध्यापासून खाली

---

२३) नियोजन हे व्यवस्थापनाचे भविष्यलक्षी कार्य होय. यात विविध व्यवस्थापकीय स्तरांवर वेगवेगळ्या योजना राबविल्या जातात. त्या अनुषंगाने खालील मांडणीतील विसंगती दाखवा.

(1) उच्च स्तरीय व्यवस्थापन : लक्ष निर्धारण

(2) मध्यस्तरीय व्यवस्थापन : समस्या समाधान

(3) निष्पादकीय व्यवस्थापन : प्रमंडळीय नियोजन

(4) कनिष्ठ स्तरीय व्यवस्थापन : क्रियात्मक नियोजन

---

२४) खालीलपैकी संदेशवहनाच्या घटकांचा योग्य तो क्रम नमूद करा.

(1) संदेशदाता, संदेश प्राप्तकर्ता, संदेश, माध्यम

(2) संदेश प्राप्तकर्ता, अंतर, माध्यम, प्रतिक्रिया

(3) संदेशदाता, परिणाम, संदेश, माध्यम

(4) संदेश, माध्यम, संदेशदाता, संदेश प्राप्तकर्ता

---

२५) 'उद्दिष्टानुसार व्यवस्थापन' या संकल्पनेत कोणता घटक महत्त्वपूर्ण आहे?

(1) उत्पादन (2) कार्यक्षमता

(3) हेतूपूर्तीसाठी संघटन रचना (4) सेवक सुविधा

---

२६) 'PODSCORB' हे तत्त्व कोणी सुरू केले?

(1) हेन्री फेयॉल (2) लुथर गुलीक (3) फ्रेडरीक टेलर (4) मेरी पार्कर

---

२७) 'शास्त्रीय व्यवस्थापन' यात महत्त्वाचा दृष्टीकोन कोणता आहे?

(1) जादा काम जादा दाम (2) सदोष कार्य, तरीही दाम

(3) संथ कार्य कमी वेतन (4) कार्य नसतानाही वेतन

---

२८) यादी क्रमांक–I आणि यादी क्रमांक–II यातून जोड्या जमवा व खालीलपैकी योग्य संकेत चिन्ह लिहा.

| *यादी–I* | *यादी–II* |
|---|---|
| अ) कंपनी माहिती पद्धत | I) स्मरणशक्ती व वेग |
| ब) संगणक | II) कर्मचारी |
| क) मानवी संबंध | III) गणन |
| ड) संघटन | IV) निर्णय करणे |
| | V) कल्याण |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | I | III | II | V |
| (2) | V | II | I | IV |
| (3) | IV | I | V | II |
| (4) | III | IV | V | I |

---

२९) कमी गुणवत्तेच्या प्रबंधकीय माहितीचा लगेच कोणता परिणाम होतो?

(1) कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेची निम्न पातळी (2) चुकीचे व्यवस्थापकीय निर्णय

(3) प्रशासनाचा अत्याधिक परिव्यय (4) हानीची संभाव्यता

---

३०) ...... हे मनुष्यबळ व्यवस्थापन विकासाचे महत्त्वाचे कार्य आहे.

(1) संघटनेची शक्ती निश्चित करणे (2) संघटनेच्या दृष्टीने मानवी कर्मचारी विकासाच्या गरजा शोधणे

(3) मनुष्यबळ कमी करणे (4) संघटनेचा विकास करणे

---

३१) संघटनेमध्ये मनुष्यबळ नियोजनाचा ...... यामध्ये महत्त्वाचा वाटा आहे.

(1) संशोधन व विकास (2) व्यक्तींची निवड (3) व्यक्तींची अदलाबदल (4) उद्दीष्ट्ये गाठणे

---

३२) कार्यरत संघटनेच्या मनुष्यबळ नियोजनाचा उद्देश ....... आहे.

अ) कामाच्या भावी योजनांच्या आवश्यकतेची मान्यता व स्थापना

ब) प्रशिक्षीत सहभागींचा पुरवटा करण्याची शाश्वती

क) उपलब्ध मनुष्यबळाचा विकास करणे

ड) वर्तमान आणि संभाव्य कामगार शक्तींचा परिणामकारक उपयोग

(1) फक्त 'अ' बरोबर (2) 'अ' आणि 'ब' दोन्ही बरोबर

(3) 'अ', 'ब' आणि 'क' तिन्ही बरोबर (4) सर्व बरोबर

---

३३) परिणामकारक नेतृत्वासंबंधी पुढील विधाने विचारात घ्या व योग्य त्या उत्तराची निवड करा –
अ) भविष्याची दृष्टी निर्माण करते
ब) त्या दृष्टीकडे वाटचाल करण्यासाठी नितीनिर्धारण विकसित करते
क) कर्मचाऱ्यांचा पाठिंबा प्राप्त करते
ड) नितीनिर्धारणाच्या अंमलबजावणीसाठी कर्मचाऱ्यांना अभिप्रेरणा देते
(1) फक्त 'अ' बरोबर
(2) 'अ' आणि 'ब' बरोबर
(3) 'अ', 'ब' आणि 'क' बरोबर
(4) सर्व बरोबर

---

३४) प्रथम खालील विधाने विचारात घ्या.
*विधान (A) :* वित्तीय बक्षीसे ही 'कामकाज कसे होते' यांच्याशी सरळ निगडीत असतात.
*कारण (R) :* जर बक्षीस पुरेसे मोठे असेल तर कर्मचारी अधिक निर्मिती करतील.
आता खालील पर्यायातून तुमचे उत्तर निवडा –
(1) A आणि R दोन्हीही सत्य आहेत आणि R हे A चे योग्य कारण आहे
(2) A आणि R दोन्ही सत्य आहेत परंतु R हे A चे योग्य कारण नाही
(3) A सत्य आहे परंतु R हे चुकीचे आहे
(4) A चुकीचे आहे परंतु R हे सत्य आहे

---

३५) प्रथम खालील विधाने विचारात घ्या –
वरीष्ठ व्यवस्थापन त्यांच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांसाठी ध्येये निश्चित करते. त्याप्रमाणे केले नाहीतर तर त्याबद्दल दंड/शासन सामान्यपणे कोणते केले जाते?
अ) बढती रोखून धरणे
ब) पगारवाढ रोखून धरणे
क) कामावरून काढून टाकणे
ड) पदावनती करणे
आता योग्य विधानांचा समुह निवडा
(1) केवळ 'अ' बरोबर
(2) 'अ' आणि 'ब' बरोबर
(3) 'अ', 'ब' आणि 'क' बरोबर
(4) सर्व विधाने बरोबर आहेत

---

३६) प्रथम प्रशिक्षणाबाबत खालील विधाने विचारात घ्या.
अ) प्रशिक्षणातून ज्ञान आणि कौशल्य प्राप्ती होते
ब) प्रशिक्षण प्रशिक्षणार्थीची वागणूक बदलते
क) प्रशिक्षणामुळे योग्यतेत वाढ होते
ड) दिलेल्या परिस्थितीत काय करावे हे प्रशिक्षण शिकवते
(1) केवळ 'अ' बरोबर आहे
(2) 'अ' आणि 'ब' बरोबर आहेत
(3) 'अ', 'ब' आणि 'क' बरोबर आहेत
(4) सर्व विधाने बरोबर आहेत

---

३७) मूल्यमापन करणे हे कशाशी संबंधित आहे?
(1) मानवसंसाधनाची गुणवत्ता
(2) वस्तुंची गुणवत्ता
(3) कामगिरीची गुणवत्ता
(4) कच्च्यामालाची गुणवत्ता

---



Study CIRCLE

३८) शिस्तीचे (अनुशासनाचे) प्रकार कोणते?
(1) होकारात्मक व नकारात्मक शिस्त
(2) बंधनात्मक शिस्त
(3) रचनात्मक शिस्त
(4) स्वयंशिस्त व सामुदायिक शिस्त

---

३९) नवीन कर्मचारी नियुक्त करण्यासाठी प्रत्येक उद्योग संस्थेकडे ...... असते.
(1) आयती तयार पद्धती
(2) सर्व साधारण पद्धती
(3) उद्योग प्रचलित पद्धती
(4) स्वतःसाठी मुद्दाम बनविलेली पद्धती

---

४०) पुढील विधाने विचारात घ्या –
*A* – कार्यवर्णनाचे सातत्याने पुनरावलोकन करणे आवश्यक आहे.
*R* – कार्यामध्ये बदल होण्याचा कल असतो. ती स्थिर नसतात.
खालील विधानावरून आपले उत्तर निवडा
(1) A आणि R दोन्ही सत्य आहेत आणि R हे A चे योग्य स्पष्टीकरण आहे
(2) A आणि R दोन्ही सत्य आहेत पण R हे A चे योग्य स्पष्टीकरण नाही
(3) A सत्य आहे परंतु R हे चुकीचे आहे
(4) A चुकीचे आहे परंतु R हे सत्य आहे.

---

४१) मनुष्यबळ नियोजनामध्ये महत्त्वाच्या बाबी ...... आहेत.
(1) कर्मचाऱ्यांचे प्रमाण आणि दर्जा
(2) शासकीय नियम आणि नियंत्रक सूचना
(3) कंपनीची साधने व सामुग्री
(4) आर्थिक व सामाजिक घटक

---

४२) ........ या नेतृत्त्व पद्धतीत सर्व निर्णय क्षमता ही नेत्याकडे केंद्रीभूत असते.
(1) निष्णात पद्धत (2) नोकरशाही पद्धत (3) सहभागी पद्धत (4) एकतंत्री पद्धत

---

४३) कामाची प्रशंसा हा ...... प्रेरक आहे.
(1) आर्थिक प्रेरक (2) आर्थिकेतर प्रेरक (3) संस्थात्मक प्रेरक (4) सामुदायिक प्रेरक

---

४४) ए. एच. मॅस्लो चे प्रेरणा सिद्धांत खालील नावाने प्रचलित आहे.
(1) ई. आर. जी. सिद्धांत
(2) गरज श्रेष्ठता श्रेणीचा सिद्धांत
(3) ध्येय सिद्धांत
(4) व्हिक्टर व्रुमचा सिद्धांत

---

४५) प्रेरणा ही ........ संकल्पना आहे.
(1) कर्मचारी व्यवस्थापन (2) सामाजिक (3) मानसिक (4) तर्क शास्त्रीय

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Study CIRCLE

४६) प्रत्येक कंपनी अथवा संघटनेला ....... असले पाहिजे.
(1) अल्पमुदतीचे प्रशिक्षण धोरण
(2) सुप्रस्थापित प्रशिक्षण धोरण
(3) परंपरागत प्रशिक्षण धोरण
(4) व्यापक प्रशिक्षण धोरण

४७) संघटनेतील शिस्त ही प्रामुख्याने ....... यांची जबाबदारी असते.
(1) कर्मचारी (2) सरकार (3) व्यवस्थान (4) सुरक्षा कर्मचारी

४८) कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण अधिक ....... बनवते.
(1) सावध व उत्साही
(2) परिणामकारक व उत्पादनशील
(3) अकार्यक्षम व आळशी
(4) टिकाव धरून राहणारा आणि ज्ञानी

४९) व्यवसाय संघटनेमध्ये नोकरभरतीचे धोरण ...... असावे.
(1) निश्चित (2) लवचिक (3) तात्पुरते (4) कायमस्वरूपी

५०) कार्य मूल्यमापन हे ...... आहे.
(1) लवचिक कार्य
(2) सातत्याने चालणारे कार्य
(3) सामुहिक कार्य
(4) काळजीपूर्वक चालणारे कार्य

५१) देणी देण्यासंबंधीचे कार्य म्हणजे ...... कार्य होय.
(1) वित्त (2) विपणन (3) खरेदी (4) उत्पादन

५२) यशस्वी व सुयोग्य अर्थसंकल्पनाच्या पद्धतीचा पाया ...... व्यवस्थापनावर आधारित असतो.
(1) वरीष्ठ (2) मध्यम (3) कनिष्ठ (4) कनिष्ठ आणि मध्यम

५३) अर्थसंकल्पाचे प्रशासन हे अर्थसंकल्प ...... कडे सोपविलेले असते.
(1) समिती (2) कार्यालय (3) खाते/विभाग (4) प्रशासन

५४) संघटीत उद्योगांच्या नियोजन आणि पूर्वानुमान या प्रक्रियेमध्ये पहिली मुलभूत पायरी कोणती?
(1) विक्रीचा अंदाज वर्तवणे
(2) आर्थिक अंदाज वर्तवणे
(3) उत्पादन विषयक अंदाज वर्तवणे
(4) अर्थविषयक अंदाज वर्तवणे

५५) शून्याधारित अंदाज पत्रकामुळे नुकसान व अकार्यक्षमता टाळली जाते व एकूण उत्पादन खर्च कमी होतो. कारण......
(1) ते उच्चपदस्थ समितीने मंजूर केलेले असते
(2) ते कार्यशील व्यवस्थापकांनी तयार केलेले असते
(3) ते खर्चलाभ विश्लेषण करून विविध पर्यायांमधून निवड केलेले असते
(4) निर्णय प्रक्रियेत सर्व थरातील कर्मचाऱ्याचा सहभाग असतो



Study CIRCLE

५६) अंदाज पत्रकीय पद्धती, जिच्यात संसाधन परिव्यय हे शेवटच्या परिणामाशी निगडीत असते, ती पद्धत म्हणजे ...... अंदाजपत्रक आहे.
(1) कार्यस्वरूपी अंदाजपत्रक
(2) मूल्यमापक अंदाजपत्रक
(3) अंतीम अंदाजपत्रक
(4) मुख्य अंदाजपत्रक

५७) प्रत्यक्ष सामुग्री खर्चाला ........ म्हणतात.
(1) स्थिर खर्च
(2) बदलता खर्च
(3) अर्ध बदलता खर्च
(4) मिश्र खर्च

५८) चालू संपत्तीचे चालू देयतेवरील आधिक्य म्हणजे ...... होय.
(1) मालकीचे भांडवल
(2) निव्वळ खेळते भांडवल
(3) कर्जावू भांडवल
(4) स्थिर भांडवल

५९) अंदाजपत्रक तयार करताना खालीलपैकी कशाची आवश्यकता नसते?
(1) अहवाल देणे
(2) पूर्वानुमान करणे
(3) किंमतपत्रक तयार करणे
(4) उद्देश निश्चित करणे


६०) ...... चे सखोल ज्ञान असल्याशिवाय कोणतीही व्यक्ती वित्तमध्ये यशस्वीपणे कार्य करू शकत नाही.
(1) अर्थशास्त्र
(2) राज्यशास्त्र
३) नगारीक शास्त्र
(4) इतिहास

६१) प्रथम खालील बाबींचा विचार करा.
अ – वेळापत्रकाचे तंतोतंत पालन करणे हे प्रकल्पाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.
ब – प्रकल्पात वेळ कुठे फुकट जातो हे शोधणे सोपे आहे.
खालीलपैकी योग्य तो पर्याय शोधावा
(1) 'अ' बरोबर आहे परंतु 'ब' चूक आहे
(2) 'ब' बरोबर आहे परंतु 'अ' चूक आहे
(3) 'अ' आणि 'ब' दोन्ही बरोबर आहेत परंतु 'अ' मुळे 'ब' शोधता येत नाही
(4) 'अ' आणि 'ब' दोन्ही बरोबर आहेत, आणि 'अ' मुळे 'ब' शोधता येतो

६२) प्रकल्पावरील निकृष्ठ नियंत्रण हे खालील कारणांनी असते –
(1) कार्यवाही अहवाल कळवण्यातील दिरंगाई
(2) अप्रस्तुत माहिती पातळी
(3) बिन भरवशाची माहिती
(4) समन्वय व माहिती आदान प्रदानाचा अभाव

६३) खालीलपैकी कोणती एक जोडी बरोबर लागू होते?
(1) खरेदी किंमत : विक्री किंमत
(2) समविच्छेदन बिंदू : ना–नफा–ना–तोटा स्थिती
(3) योगदान : विक्री वजा स्थिर खर्च
(4) सुरक्षिततेची मर्यादा : प्रत्यक्ष विक्री

६४) खालील नेटवर्कचा विचार करा.




वरील नेटवर्क वरून निर्णायक मार्ग (क्रिटीकल पाथ) निश्चित करा –

(1) १–२–४–५–६ (2) १–२–३–६ (3) १–२–३–४–५–६ (4) यापैकी नाही

---

६५) प्रश्न क्रमांक ६४ मध्ये दिलेल्या नेटवर्क वरून दिलेल्या प्रकल्पासाठी किती वेळ लागेल?

(1) ११ दिवस (2) ९ दिवस (3) ८ दिवस (4) यापैकी कोणताही नाही

---

६६) नेटवर्क काढताना कुठल्या क्रमाने बाबी येतात?

(1) क्रियेस लागणारा वेळ – बाण आकृती – क्रिटीकल मार्ग – क्रियांची यादी – परस्पर संबंध

(2) क्रिटीक मार्ग – क्रियांची यादी – क्रियेस लागणारा वेळ – परस्पर संबंध – बाण आकृती

(3) बाण आकृती – क्रियांची यादी – क्रिटीकल मार्ग – क्रियेस लागणारा वेळ – परस्पर संबंध

(4) क्रियांची यादी – परस्पर संबंध – क्रियेस लागणारा वेळ – बाण आकृती – क्रिटीकल मार्ग

---

६७) खालील बाबींचा विचार करा.

अ – पर्ट/सी.पी.एम. यांना नेटवर्क नियोजन म्हणतात.

ब – पर्टचे तंत्रज्ञान मोठ्या प्रकल्पांचे नियोजन करण्यासाठी विकसीत झाले.

क – पर्ट/सी.पी.एम. मुळे साधन संपत्तीचे नियोजन होते.


खालील पर्यायातून योग्य उत्तर निवडा.

(1) फक्त 'अ' बरोबर आहे (2) 'अ' आणि 'ब' बरोबर आहेत

(3) 'अ', 'ब' आणि 'क' बरोबर आहेत (4) 'अ', 'ब' आणि 'क' कोणतेही बरोबर नाहीत

---

६८) प्रथम खालील नेटवर्क पहा –




नंतर खालील पर्यायातून उत्तर निवडा –

(1) P ही क्रिया केव्हाही सुरू होऊ शकते व ती M आणि N वर अवलंबून नाही

(2) N ही क्रिया सुरू होण्याआधी M ही क्रिया संपली पाहिजे

(3) M आणि N या दोन्ही क्रिया P सुरू होण्याआधी संपणे आवश्यक आहे

(4) M सुरू होण्याआधी N संपणे आवश्यक आहे

---

६९) प्रथम खालील बाबी लक्षात घ्या.

अ) नेटवर्क आकृतीबंध क्रियांमधील परस्पर संबंध व क्रमवारी दर्शवतो.

ब) नेटवर्क आकृतीबंधात प्रत्येक क्रिया बाणांच्या साह्याने दर्शवितात.

आता खालील पर्यायातून योग्य उत्तर निवडा –

(1) 'अ' बरोबर आहे, परंतु 'ब' चूक आहे
(2) 'ब' बरोबर आहे, परंतु 'अ' चूक आहे
(3) 'अ' आणि 'ब' दोन्ही बरोबर आहेत
(4) 'अ' आणि 'ब' दोन्ही बरोबर नाहीत

---

७०) प्रकल्पाचा कालावधी कमी करावयाचा असल्यास

अ) ज्या क्रिया निर्णायक मार्गावर (क्रिटीकल पाथ) येतात त्यांचा कालावधी कमी केला पाहिजे.

ब) ज्या क्रिया निर्णायक मार्गाच्या बाहेर येतात त्यांचा कालावधी कमी केला पाहिजे.

खालीलपैकी योग्य उत्तर निवडा –

(1) 'अ' बरोबर आहे, परंतु 'ब' चूक आहे
(2) 'ब' बरोबर आहे, परंतु 'अ' चूक आहे
(3) 'अ' आणि 'ब' दोन्ही बरोबर आहेत
(4) 'अ' आणि 'ब' दोन्ही बरोबर नाहीत

---

७१) एका धार्मिक स्थळी चेंगराचेंगरीमुळे २९ व्यक्तींचा मृत्यू झाला. भविष्यात असे घडू नये यासाठी कोणती पावले उचलावित?

अ) दुर्व्यवस्थेबद्दल विश्वस्तांना अटक करावी.

ब) प्रवेश नियंत्रित करून बाहेर जाण्याचे रस्ते वाढवावेत.

क) पोलीस/होमगार्डस्‌ची संख्या वाढवून गर्दी नियंत्रण करावे.

ड) लोकांच्या हालचाली न्याहाळण्यासाठी क्लोज सर्किट टीव्ही लावावेत.

(1) फक्त 'अ' बरोबर
(2) 'अ' आणि 'क' बरोबर
(3) 'अ', 'ब' आणि 'क' बरोबर
(4) 'ब', 'क' आणि 'ड' बरोबर

---

७२) शहरातील रस्त्यांवरील अतिक्रमणे कमी करण्यासाठी कोणती उपाय योजना जास्त परिणामकारक राहील?

(1) राजकीय नेत्यांच्या सभा घेऊन त्यांना अतिक्रमण करणाऱ्यांना संरक्षण देऊ नका अशी विनंती करणे
(2) अतिक्रमकांना कडक कार्यवाही होईल याबद्दल इशारा द्यावा
(3) अतिक्रमकांना पर्यायी जागा द्यावी
(4) अतिक्रमण होऊच नये यासाठी एक दक्षता दल नेमावे

---

७३) एका ठिकाणी कोणतातरी रोग साथीसारखा पसरून २४ तासात ४० लोकांना त्याची लागण झाली व त्यापैकी ५ व्यक्तींना मृत्यू आला. दवाखान्यांमध्ये रोगाचे निदानच होऊ शकले नाही या बातमीमुळे खळबळ माजली आहे. अशा परिस्थितीत कोणता उपाय सर्वात जास्त परिणामकारक राहील?

(1) निष्णात संशोधक व डॉक्टर्स आमंत्रित करून त्यांना रोगाचे कारण व त्यावर त्वरित उपाय शोधून काढावयास लावावे
(2) गावातील केरकचरा काढण्याची, लस टोचण्याची व जंतुनाशक फवारे मारण्याची मोहीम सुरू करावी
(3) ज्यादा रुग्ण वाहिका व फिरती रुग्णालये उपलब्ध करावीत
(4) लोकांना रेडीओ, घोषणा आणि भित्ती लिखाण याद्वारे स्वच्छता राखण्याबद्दल जागरूक करावे.

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

७४) पुरामुळ होणाऱ्या हानीस टाळण्यासाठी जिथे नेहमी पूर येतो त्या भागात कोणती उपाययोजना करणे जास्त परिणामकारक राहील?

(1) अशा ठिकाणी हवामान खात्याचे कार्यालय उघडावे जेणे करून पूराबद्दल पूर्वसूचना देता येईल

(2) अभियंते आणि तंत्रज्ञ यांच्या सल्ल्यानुसार योग्य ती स्थायी उपाय योजना करावी

(3) पुरात बळी पडलेल्या लोकांना मदत करण्यासाठी एक मोठा स्वयंसेवकाचा जथ्था तयार ठेवावा

(4) पूरत्रस्थ विभागातील नागरिकांना पावसाळ्यापूर्वी हलवावे

---

७५) भारतातील बेकारी कमी करण्यासाठी कोणता उपाय जास्त परिणामकारक राहील?

(1) अधिक प्रमाणावर सरकारी नोकऱ्या उपलब्ध कराव्यात

(2) युवकांनी शेती करावी म्हणून प्रेरणा द्यावी

(3) स्वयंरोजगार योजनांना भरपूर प्रसिद्धी देऊन आर्थिक तथा अन्य मदत द्यावी

(4) सरकारी मदतीवर चालणाऱ्या सर्व संस्थांमधील निवृत्ती वय कमी करावे

---

७६) लोकांचे शहराकडे स्थलांतर करण्याचे कारण म्हणजे

(1) तेथे सर्व सुविधा उपलब्ध आहेत
(2) सर्वांना राहण्यासाठी घरे मिळतात
(3) सर्वांना शिक्षण मिळते
(4) रोजगार मिळण्याच्या संधी उपलब्ध असतात

---

७७) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना ...... कायद्याने झाली.

(1) बी.एम.सी. कायदा १८८८
(2) म.प्रा.व.न.र. अधिनियम १९६६
(3) बी.एम.आर्.डी.ए. कायदा १९७४
४) बी.एम.आर.डी.ए. कायदा १९७०

---

७८) पुढील विधानांचा विचार करा.

अ) शहरीकरण औपचारिक नियंत्रणात वाढ करते

र) लोकांच्या संरक्षणासाठी पोलीस, कोर्ट, सामाजिक कायदे व सामाजिक तरतूद आवश्यक ठरतात.

(1) 'अ' व 'र' बरोबर आहेत
(2) 'अ' व 'र' चुकीचे आहेत
(3) 'अ' बरोबर व 'र' चुकीचे आहे
४) 'अ' चुकीचे व 'र' बरोबर आहे

---

७९) नद्यांच्या पाण्याचे ८५% प्रदूषण ...... यामुळे होते.

(1) गढूळ पाणी
(2) घरगुती टाकाऊ पदार्थ
(3) अयोग्य स्वच्छता
(4) झोपडपट्टीचे अस्तित्व

---

८०) निवारा ही एक ...... समस्या आहे.

(1) सामाजिक
(2) सांस्कृतिक
(3) आर्थिक
(4) राजकीय

---

८१) नव्या मुंबईने ...... ही भूमिका करावी ही अपेक्षा आहे.

(1) नवे शहर
(2) नवे अधिसूचित क्षेत्र
(3) मुंबईची प्रतिकृती
(4) उपग्रह शहराच्या विकासाचा केंद्रबिंदू

---

८२) सार्वजनिक क्षेत्रात घरे बांधण्याची जबाबदारी..... या संस्थेची आहे.
(1) म्हाडा (2) सिडको (3) बी.एम.सी. (4) म्हाडा व सिडको

---

८३) महानगरामध्ये कामगार संस्थेचे सर्वाधिक प्रमाण पुढीलपैकी कोणत्या व्यावसायिक प्रकारात आढळते?
(1) बांधकाम व्यवसाय (2) उत्पादन (3) व्यापार उदीम व सेवा (4) घरगुती उद्योग

---

८४) भारतात स्वातंत्र्यानंतरही शहर विरोधी भावना राहिली कारण –
(1) नागरीकरणामुळे जास्त लोक शहराकडे आकर्षित होण्याची भिती
(2) ७५% जनता ग्रामीण भागात राहते
(3) नागरीकरण हे उद्योगपतींचे कार्यक्षेत्र आहे
(4) भारत समाजवादी देश आहे

---

८५) नागरी जमीन म्हणजे ...... शहराच्या उपयोगासाठी विकसित केलेली जमीन
(1) योग्य पायाभूत सुविधा असलेली (2) करमणुकीची सोय असलेली
(3) घरे असलेली (4) पर्यटन व्यवस्था असलेली

---

८६) 'नैसर्गिक धारणाक्षम विकास' या संज्ञेमध्ये पुढील आशय अभिप्रेत आहे
(1) संतुलित सामाजिक आर्थिक विकास
(2) निसर्गाच्या सुरक्षिततेसाठी भौतिक विकासावर बंधने घालणे
(3) लोकांचे आरोग्य व पर्यावरणाचा समतोल यावर दुष्परिणाम होऊ न देता नैसर्गिक साधनसंपत्तीचा पर्याप्त वापर करून साध्य करावयाचा विकास
(4) लोकांच्या किमान गरजा भागविण्यासाठीचा विकास

---

८७) सर्वाधिक स्त्री साक्षरता असलेले महाराष्ट्रातील शहर
(1) रत्नागिरी (2) पुणे (3) कोल्हापूर (4) मुंबई

---

८८) खालीलपैकी कोणते नवीन शहर हे दोन राज्यांची राजधानी आहे?
(1) गांधीनगर (2) नवी मुंबई (3) चंदीगड (4) बंगलोर

---

८९) मुंबईचे प्रथम रहिवासी ........ होते.
(1) प्रामुख्याने श्रीमंत लोक (2) प्रामुख्याने मध्यमवर्गीय लोक
(3) प्रामुख्याने दारिद्री शेतकरी (4) प्रामुख्याने कष्टकरी लोक

---

९०) महाराष्ट्रामध्ये एकूण किती महानगरपालिके आहेत?
(1) १२ (2) १३ (3) १४ (4) १५

---

९१) कोणता प्राधिलेख हा व्यवस्थापकीय मुख्यत्यारी नियंत्रित करणारे परिणामकारी हत्यार आहे.
(1) महादेश (2) क्काधिकार (3) प्राकर्षण (4) प्रतिषेछ

---

९२) कोणती विधाने बरोबर आहेत ते सांगा.
अ) कोणत्याही मुस्लीम व्यक्तीस 'वक्फ' करता येतो.
ब) मुस्लीमेत्तरांनाही 'वक्फ' करता येतो.
क) अज्ञान व्यक्तीस 'वक्फ' करता येत नाही.
(1) फक्त 'अ' बरोबर आहे
(2) 'अ' आणि 'ब' बरोबर आहे
(3) 'अ', 'ब' आणि 'क' बरोबर आहेत
(4) 'अ' आणि 'ब' बरोबर आहेत

---

९३) निश्चित विधान (अ) 'मुलभूत हक्क' हे परिपूर्ण हक्क नाहीत
कारण (र) राज्य घटनेमध्ये मुलभूत हक्काचा संकोच व त्यांना स्थगिती याविषयी तरतूद आहे
(1) 'अ' आणि 'र' ही दोन्ही विधाने सत्य असून 'र' हे 'अ' चे खरे कारण आहे
(2) 'अ' आणि 'र' ही दोन्ही विधाने सत्य आहेत, परंतु 'र' हे 'अ' चे खरे कारण नाही
(3) 'अ' सत्य परंतु 'र' असत्य आहे
(4) 'अ' असत्य आणि 'र' सत्य आहे

---

९४) देहोपस्थिती (Habeas corpus) हा प्राधिलेख (writ) पुढील कारणासाठी काढता येऊ शकतोय
(1) समाजविरोधी प्रवृत्ती (व्यक्ती) तुरुंगामध्ये ठेवणे
(2) बेकायदा स्थानबद्धतेतून एखाद्या व्यक्तीची मुक्तता करणे
(3) कैद्यांना आवश्यक सुविधा पुरविण्याबाबत तुरुंग अधिकाऱ्यांना आदेश देणे
(4) कैद्याचे अमानवी व पाशवी अत्याचारापासून रक्षण करणे

---

९५) योग्य पर्याय निवडा.
मृत्युपत्र न करणाऱ्या व्यक्तीच्या मृत्युसमयी उदरात असणारे व अशा व्यक्तीच्या मृत्युनंतर जन्मास आलेले व जीवंत राहिलेल्या अपत्यास ....
अ) मृत्युपत्र न करणाऱ्या व्यक्तीचा वारसाहक्क प्राप्त होतो.
ब) वारसाहक्क प्राप्त होत नाही कारण मृत्युपत्र न करणाऱ्या व्यक्तीच्या मृत्युनंतर त्याचा जन्म झालेला असतो.
क) मृत्युपत्र न करणाऱ्या व्यक्तीचे बाबतीत सर्शत वारसा हक्क प्राप्त होतो.
(1) 'अ' बरोबर आहे
(2) 'ब' बरोबर आहे
(3) 'ब' आणि 'क' बरोबर आहेत
(4) यातील कोणताही पर्याय बरोबर नाही

---

९६) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.
हिंदू विवाह कायद्याच्या कलम ११ नुसार जो विवाह निरर्थक व वर्ज्य आहे अशा विवाहातून जन्माला आलेले मूल ....
(1) अनौरस संतती असते
(2) औरस संतती असते
(3) वारसा हक्कास पात्र नसते
(4) विवाहबाह्य संतती समजली जाते

---

९७) *निश्चित विधान (अ) :* न्यायाधीश कायद्याचे निर्माते नसून संशोधक असतात
*स्पष्टीकरण (इ) :* जो मनुष्य एखाद्या वृक्षाचे ओंडके कापतो, एका अर्थाने त्यानेच ओंडके तयार केले आहे असे होते.
(1) 'अ' आणि 'इ' ही दोन्ही विधाने सत्य असून 'इ' हे 'अ' चे स्पष्टीकरण आहे
(2) 'अ' आणि 'इ' ही दोन्ही विधाने सत्य आहेत परंतु 'इ' हे 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही
(3) 'अ' सत्य असून 'इ' चूक आहे
(4) 'अ' चूक असून 'इ' सत्य आहे

९८) ''भारतीय न्यायव्यवस्थेतील साम्य'' ह्या संदर्भात केलेल्या खालील विधानापैकी योग्य विधान निवडा –
(1) साम्य लागू करण्याकरीता आपल्याकडे स्वतंत्र न्यायालये आहेत
(2) भारतीय न्याय व्यवस्था साम्याचा पाठपुरावा करीत नाही
(3) विशिष्ठ कायद्याअभावी देखील न्यायालये साम्यतत्वे पाळतात
(4) न्यायालये फक्त साम्यच पाळतात

९९) स्पष्टीकरणाचा 'सुवर्ण नियम' (Golden Rule) म्हणजे ....
(1) कायद्याच्या व्याकरणीय अर्थाची रचना करणे
(2) कायद्याचा सामान्य हेतू ठरविणे
(3) कायद्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी विचारात घेणे
(4) कायद्याची अन्य कायद्याशी तुलना करणे

१००) ज्युरिसप्रुडन्स म्हणजे काय?
ज्युरिसप्रुडन्स म्हणजे ....
(1) शहाण्या माणसांचा जमाव
(2) जमाव
(3) कायद्याचा कायदा
(4) एक संस्था

□□□

## Answers

१) स्थानिक स्वराज्य संस्थांवरील राज्य नियंत्रण व देखरेख आवश्यक असते कारण ....

अ) स्थानिक सरकारे राज्याच्या कायद्याने निर्मिलेली असतात

ब) राज्याच्या एका भागाचे त्या शासन करतात

क) त्या तांत्रिक कौशल्ये मोठ्या प्रमाणात धारण करीत नाहीत

ड) राज्याकडून त्यांना वित्तीय साह्य मिळते

(1) फक्त 'अ' बरोबर आहे
(2) 'अ' व 'ब' बरोबर आहेत
(3) 'अ', 'ब' व 'क' बरोबर आहेत
(4) सर्व बरोबर आहेत.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १–४ | २–२ | ३–४ | ४–३ | ५–४ | ६–४ह्न | ७–४ | ८–२ | ९–१ | १०–१ |
| ११–४ | १२–१ह्न | १३–३ | १४–२ | १५–२ | १६–३ | १७–३ | १८–३ | १९–१ | २०–१ |
| २१–३ | २२–३ | २३–४ | २४–४ | २५–३ | २६–२ | २७–१ | २८–३ | २९–२ | ३०–२ |
| ३१–४ | ३२–४ | ३३–४ | ३४–१ | ३५–४ | ३६–४ | ३७–१ | ३८–४ | ३९–४ | ४०–१ |
| ४१–१ | ४२–४ | ४३–२ | ४४–२ | ४५–३ | ४६–४ | ४७–३ | ४८–२ | ४९–२ | ५०–४ |
| ५१–१ | ५२–४ | ५३–४ | ५४–१ | ५५–३ | ५६–२ | ५७–१ | ५८–२ | ५९–१ | ६०–१ |
| ६१–४ | ६२–४ | ६३–२ | ६४–३ | ६५–१ | ६६–२ | ६७–१ | ६८–३ | ६९–३ | ७०–१ |
| ७१–४ | ७२–४ | ७३–२ | ७४–४ | ७५–३ | ७६–४ | ७७–३ | ७८–१ | ७९–३ | ८०–३ |
| ८१–४ | ८२–४ | ८३–३ | ८४–२ | ८५–१ | ८६–३ | ८७–४ | ८८–३ | ८९–४ | ९०–४ |
| ९१–२ | ९२–१ | ९३–१ | ९४–२ | ९५–१ | ९६–१ | ९७–३ | ९८–३ | ९९–२ | १००–३ |